**प्रकल्प प्रवर्तक मे. भिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, टाकळी सिकंदर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर - महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन ८,०००.० मे. टन प्रतिदिन (३,०००.० मे.टन प्रतिदिन वाढ) करणे, तसेच नविन ३.० मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्प स्थापना करणे आणि नविन मोलॅसिस (बी आणि सी)/ केन सिरप वर आधारित २००.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. भिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, टाकळी सिकंदर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर - ४११ , महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन ८,०००.० मे. टन प्रतिदिन (३,०००.० मे.टन प्रतिदिन वाढ) करणे, तसेच नविन ३.० मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्प स्थापना आणि नविन मोलॅसिस (बी आणि सी) / केन सिरप वर २००.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मनिषा कुंभार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक

जनतेचे स्वागत करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. भिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, टाकळी सिकंदर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर - ४११, महाराष्ट्र यांना त्यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरून ८,०००.० मे. टन प्रतिदिन विस्तारिकरण करणे, तसेच नविन ३.० मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्प स्थापना आणि नविन मोलॅसिस (बी आणि सी) / केन सिरप वर आधारित २००.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १७-०४-२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए - साखर उत्पादन - ५ (जे), सहविद्युत प्रकल्प - १ (डी) आणि आसवणी - ५ (जी) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय,

भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २९-०४-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०९-०५-२०२३ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार नियुक्त करून पर्यावरण सल्लागारव्दारे १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले. प्रकल्पाच्या विस्तारामुळे पर्यावरणावरील प्रस्तावित परिणामाचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक 20/06/2024 नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती. मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-१७० / २०२४, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी—२४११२६-एफटीएस-००५१, दिनांक २६-११-२०२४ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना

एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी - पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत व दैनिक वृत्तपत्र दिव्य मराठी यात इंग्रजीत दिनांक २७ ऑक्टोबर, २०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-मोहोळ, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-मोहोळ, जिल्हा-सोलापूर,

७) तहसीलदार, तहसील कार्यालय-पंढरपूर, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूर,

८) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-पंढरपूर, जिल्हा-सोलापूर,

९) **<u>तालुका-मोहोळ - ग्रामपंचायत कार्यालये-</u>**
वरकुटे, शेजबाभुळगाव, पाटकुल, टाकळी सिंकदर, सौंदणे, औंढी, आढेगांव, पेनूर, कोथाळे, अंकोली,

१०) **<u>तालुका- पंढरपूर - ग्रामपंचायत कार्यालये-</u>**
मौजे फुलचिंचोली, तारापूर, पुळूज, पोहोरगांव, आंबेचिंचोली ,मगरवाडी,

११) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

१२) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट,तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्रमांक ७, सिलेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१३) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, २रा व ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३

१४) उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर-४१३ ००३

१५) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ -

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्प हा स्थानिक शेतक-यांच्या फायदाचा असून प्रस्तावित आसवणी प्रकल्पासाठी गुंतवणूक ₹ २००.० कोटी, तर प्रस्तावित साखर विस्तारिकरण कारखान्यासाठी ₹ ९०.० कोटी एवढी आहे. तसेच प्रस्तावित विस्तारित साखर कारखाना व आसवणी प्रकल्प यात सुमारे ३५० मनुष्यबळाची गरज असून त्यासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. प्रस्तावित

आसवणी प्रकल्पातील सी.पी.यु. मुळे सांडपाण्याचा १००% पुनर्वापर होणार असून सदरहू आसवणी प्रकल्प ही झेड.एल.डी. -शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. प्रस्तावित प्रकल्पात पर्यावरण संरक्षणासाठी रुपये २१.५४ कोटींची तरतुद करण्यात आलेली असून परिसरातील सामाजिक व आर्थिक विकासासाठी (सीएसआर) ₹ २.९० कोटींची तरतुद ( ₹ २९०.० कोटींच्या १%) करण्यात आलेली आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे, मात्र प्रकल्पात त्यापेक्षा जास्त म्हणजे ३४% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. प्रस्तावित प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च ₹ २,१५४.० लाख तर विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा देखभालीसाठी प्रतिवर्षी ₹ २९२.० लाख एवढा खर्च करण्यात येणार आहे.

सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री. लक्ष्मण प्रभू किलमिशे, मुक्काम पोस्ट-फुलचिंचोली, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-**

प्रस्तावित आसवणी प्रकल्प किती दिवस कार्यान्वित राहिल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, आसवणी प्रकल्पासाठी कच्चा माल म्हणून ऊस हंगामात ऊसाचा रस वापरणार असून ऊसाचे गाळप संपल्यानंतर/हंगाम संपल्यानंतर बी किंवा सी मोलॅसिस कच्चा माल म्हणून वापरणार आहोत. त्यामुळे प्रस्तावित आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस कार्यान्वित राहणार आहे, तर साखर विभाग हा १८० दिवस कार्यान्वित राहिल.

२) **<u>श्री. भारत विठ्ठल पाटील, मुक्काम पोस्ट-पुळूज, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या आजूबाजूस असणा-या शेतक-यांना कोणता फायदा होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सादरीकरणात दर्शविल्यानुसार जोड उत्पादने घेतल्याशिवाय कारखान्याची आर्थिक परिस्थिती चांगली राहू शकत नाही. आसवणी प्रकल्पात मोलॅसिस वापरण्यात येईल, त्यामुळे कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळाल्यामुळे ऊसाला अतिरिक्त भाव शेतक-यांना देता येईल. प्रकल्पात जी राख उत्पन्न होईल, त्यात पोटॅश टाकून त्या खताची विक्री करुन कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. तसेच प्रकल्पात $CO_2$ बॉटलिंग हा प्रकल्प आहे. फर्मनटेशन करताना जो $CO_2$-कार्बन-डाय-ऑक्साईड तयार होतो, तो बाटलीत भरुन शीतपेये उत्पादकांना विकल्याने कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे या प्रकल्पांमुळे कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळणार असल्याने शेतक-यांच्या ऊसाला चांगला दर देता येऊ शकतो. त्यामुळे शेतक-यांचा फायदाच होणार आहे.

३) **<u>श्री. सुर्यभान अंकुश कांबळे, मुक्काम पोस्ट-शंकरगाव, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्प उत्पादन प्रक्रियेमुळे जे वायू प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषण होईल, ते नियंत्रणासाठी काय उपाययोजना करण्यात येतील?

डिआमोरे

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, बॉयलरमध्ये इंधन जाळल्याने जो फ्लु गॅस निर्माण होईल, तो ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिरपरेटर) या अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणेस जोडण्यात येईल. ईएसपीमध्ये फ्लु गॅसमधील सर्व धुळीकण (particles) अडकले (arrest) जातात. नंतरच जो स्वच्छ धूर आहे, तो चिमणीतून बाहेर सोडला जातो. ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिरपरेटर) बॉयलरला जोडणार आहोत.

आसवणी प्रकल्पात जास्त ध्वनी उत्पन्न करणारी उपकरणे, मशिनरी नाही. प्रकल्पात ध्वनी उत्पन्न होणा-या विभागातील कर्मचा-यांना पीपीई (Personal Protection Equipment) म्हणजे इअर मग्स, इअर प्लग्स उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरहू प्रकल्प हा अत्याधुनिक असल्याने प्रकल्पातील ब-याच क्रिया हया अत्याधुनिक पध्दतीने म्हणजे स्वयंचलित नियंत्रणाने (automated control) होणार आहेत. तसेच प्रकल्पातील सर्व कामगार, कर्मचारी यांची वार्षिक वैदकीय तपासणी (Annual Medical Checkup) ही करण्यात येणार आहे.

४) **<u>श्री. शिवाजी गुरुसिध्द शेंडगे, राहणार- पुळूज, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रस्तावित प्रकल्पामुळे किती लोकांना रोजगाराची संधि मिळू शकते?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, कार्यरत प्रकल्पात ३०० (तीनशे) व्यक्ती काम करत आहेत. प्रस्तावित प्रकल्पात म्हणजे साखर उत्पादन विस्तारीकरण आणि आसवणी प्रकल्प, यामुळे अतिरिक्त ३५० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते. त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. जर प्रकल्पात कौशल्यधारी पदे असल्यास, स्थानिकांसाठी कौशल्यविकास प्रशिक्षण आयोजित करण्यात येऊन यशस्वी व्यक्तींना रोजगाराची संधि देण्यात येईल.

५) **<u>मिस रेश्मा सचिन दळवी, राहणार-टाकळी सिकंदर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रस्तावित आसवणी प्रकल्पातून रोज किती अल्कोहोल तयार होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रस्तावित आसवणी प्रकल्पाची २,००,०००.० लिटर प्रति दिन (दोन लाख लिटर प्रति दिन) उत्पादन करण्याची क्षमता आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही अतिरिक्त माहिती, सूचना, विचार किंवा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**६) <u>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

बैठकीत श्री. भारत पाटील, यांनी ग्रामस्थांना प्रश्न उपस्थित केलेला आहे की, प्रस्तावित कारखान्यामुळे परिसरातील शेतक-यांना आणि ग्रामस्थांना काय फायदा होणार आहे. तर तो फायदा असा की, प्रकल्प प्रवर्तक ऊसाचे बीयाणे देणार आहेत का, माती परिक्षण करुन देणार आहेत का, पाणी परिक्षण करणार आहेत काय, एखादी प्रयोगशाळा उभी करणार आहेत का, स्थानिकांसाठी, महिलांसाठी काही रोजगार निर्मिती करणार आहेत का, स्थानिक शेतक-यांना, महिलांना या प्रकल्पाचा काय फायदा होऊ शकतो हे साध्या भाषेत सांगण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती देताना सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणारच आहे. प्रस्तावित प्रकल्पात ३५० व्यक्तींना रोजगाराची संधी मिळू शकते. प्रयोगशाळा उभी करणार आहोत, त्यामुळे माती परिक्षणाव्दारे स्थानिक शेतक-यांनी कोणती पिके लावावीत याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पात स्थानिक महिलांनाही रोजगाराची संधि देण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पात ३५० प्रत्यक्ष रोजगाराबरोबरच कारखाना परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात/रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल, उदा.– स्थानिक मोबाईल दुरुस्ती दुकाने, दुचाकी दुरुस्ती दुकाने, चहा-शीतपेयांची दुकाने, वाहतुकदार इ.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की, स्थानिकांना अतिशय योग्य प्रकारे प्रश्न, सूचना मांडलेल्या असून त्यास प्रकल्प

पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. तरी मा. अध्यक्षा यांना पुढील कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

बैठकीचा समारोप करताना मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आज आपण प्रकल्प प्रवर्तक मे. भिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, टाकळी सिकंदर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर - ४११ , महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ५,०००.० मे. टन प्रतिदिन वरुन ८,०००.० मे. टन प्रतिदिन (३,०००.० मे.टन प्रतिदिन वाढ) करणे, तसेच नविन ३.० मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्प स्थापना आणि नविन मोलॅसिस (बी आणि सी) / ऊसाचा रसवर आधारित २००.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्र जमलेलो आहोत. प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्प व त्याच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे व उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिलेली आहेत. या पर्यावरण जनसुनावणीचा मूळ उद्देशच आहे की, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होणार आहे, आणि त्याच्या नियंत्रणासाठी काय उपाययोजना नियोजित आहेत हे परिसरातील जनतेस अवगत करणे. त्याचप्रमाणे स्थानिकांनी, उपस्थितांनी विचारलेल्या शंका, प्रश्न यांना उत्तर देणे अपेक्षित आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या लेखी स्वरुपात आजपर्यंत सादर करण्याची सूचना केली. येथे महत्वाची गोष्ट म्हणजे येथे आम्ही कोणताही निर्णय घेत नाही, तर जनतेच्या सूचना, आक्षेप हे शासनास सादर करण्यात येतात.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

प्राप्त लेखी सुचना/हरकती/टिप्पणी/तक्रार प्राप्त सोबत जोडले आहे.

**(निखील मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, सोलापूर

**(जगन्नाथ शं. साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, पुणे

**(मनिषा कुंभार)**
अध्यक्षा
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
जिल्हा - सोलापूर